Hanuman Chalisa Path
"Divine Chants • Infinite Blessings"

# श्री हनुमान आरती संग्रह – मराठी



## आरती १ – ॥ सत्राणें उड्डाणें ॥

सत्राणें उड्डाणें हुंकार वदनी |
करि डळमळ भूमंडळ सिंधुजळ गगनीं |
कडाडिले ब्रम्हांड धाके त्रिभुवनी |
सुरवर नर निशाचर त्या झाल्या पळणी ||१||

HanumanChalisaPath.CoM

जय देव जय देव जय श्रीहनुमंता
तुमचेनी प्रसादें न भी कृतांता ||धृ||

दुमदुमलें पाताळ उठिला प्रतिशब्द |
थरथरला धरणीधर मनिला खेद |
कडाडिले पर्वत उड्गण उच्छेद |
रामी रामदास शक्तीचा शोध ||2||

Downloaded From HanumanChalisaPath.CoM

जय देव जय देव जय श्रीहनुमंता ||

-श्री रामदास स्वामी

# आरती २ – ॥ जय देवा हनुमंता ॥

जय देवा हनुमंता । जय अंजनी सुता ॥
ॐ नमो देवदेवा । राया रामाच्या दूता ॥
आरती ओवाळीन । ब्रह्मचारी पवित्रा ॥ धृ. ॥

HanumanChalisaPath.CoM

वानररुपधारी । ज्याची अंजनी माता ॥
हिंडती वनांतरी । भेटी झाली रघुनाथा ।
धन्य तो रामभक्त । ज्याने मांडिलीं कथा ॥ १ ॥

सीतेच्या शोधासाठीं । रामें दिधली आज्ञा ॥
उल्लंघुनी समुद्रतीर । गेला लंकेच्या भुवना ।
शोधूनी अशोकवना। मुद्रा टाकिलि खुणा ॥ २ ॥

सीतेसी दंडवत । दोन्ही कर जोडून ॥
वन हे विध्वंसिलें । मारिला अखया दारूण ॥
परतोनी लंकेदरी । तंव केले दहन ॥ ३ ॥

निजवळें इंद्रजित । होम करीं आपण ॥
तोही त्वां विध्वंसिला लघुशंका करून ।
देखोनी पळताती ॥ महाभूतें दारूण ॥ ४ ॥

राम हो लक्ष्मुमण । जरी पाताळीं नेले ॥
तयांच्या शुद्धीसाठी । जळी प्रवेशे केले ॥
अहिरावण महिरावण । क्षणामाजीं मर्दिले ॥ ५ ॥

देउनि भुभु:कार । नरलोक आटीले ॥
दीनानाथा माहेरा त्वां ॥ स्वामिसी सोडविले ॥
घेऊनि स्वामी खांदी । अयोध्येसी आणिलें ॥ ६ ॥

Downloaded From HanumanChalisaPath.CoM

हनुमंत नाम तुझें । किती वर्णू दातारा ॥
असती सर्वठायी । हारोहारीं अंबरा ॥
एका जनार्दनीं ॥ मुक्त झाले संसारा ॥ ७ ॥

# आरती ३ – ॥ अघटित भीमपराक्रम ॥

अघटित भीमपराक्रम जय जय हनुमंता ।
अंजनिबालक म्हणविसी अपणा बलवंता ॥
उपजत किलाणमात्रें आक्रमिसी सविता ।
रावण गर्वनिकंद कपिबलयदातां ॥१॥

HanumanChalisaPath.CoM

जय देव जय देव जय मारूतीराया
ब्रह्मासुखामृतसागर वंदित मी सदया ॥धृ॥

दुर्घटसागर उडोनी सीतेची शुद्धी ।
मर्दुनी जंबूमाळी करिसी सद्बुद्धी ॥
भवलंकापुर जाळुनि नावरसी युद्धीं ।
रघुपतिनिजकार्याची करिसी तूं शुद्धी ॥२॥

Downloaded From HanumanChalisaPath.CoM

जिंकिसी विषयसमुद्रा पवनात्मज रुद्रा ।
निजजनदु:खदरिद्रा पळविसी तूं भद्रा ॥
कपिकुलमंडणचंद्रा हरिं हे जडचंद्रा ।
सुखकर यतिवर वंदित मौनी पदमुद्रा ॥३॥

# आरती ४ – ॥ माया शोधाविषयीं ॥

माया शोधाविषयीं तरलासि समुद्रा ।
मध्यें भयंकरीला करिसी ह्रच्छिद्रा ॥
नमुनि श्रीला देसी दशरथीमुद्रा ।
लंका जाळूनि येसी एकादशरुद्रा ॥१॥

जय देव जय देव जय मारुतिराया ।
जगदुद्धार कराया येसी या ठाया ॥धृ॥

HanumanChalisaPath.CoM

रुदन करी राम तया बहुसुखिया केला ।
सेतू बांधुनि सकपी नेशी लंकेला ॥
दशवदनदिक मारुनि आणिलि सीतेला ।
दासा बिभीषणाला लंकापति केला ॥२॥

ती कीर्ति तव अतुला वर्णिल कोण जनी ।
तरले दु:खसमुद्री बहू नर तव भजनीं ॥
सत्वर पावसी ऐसें कथिलेंसे सुजनीं ।
तव दर्शनवियोगे निरसे भ्रम रजनीं ॥३॥

राहावें ममह्रुदयी सदया कपिराया ।
अखिलहि अधिव्याधी निर्मुल कराया ॥
मन्मन निर्मल व्हावें निस्पृह विचाराया ।
न जसा विलंब उदकी लवणास विराया ॥४॥

Downloaded From HanumanChalisaPath.CoM

या देही या नयनीं ब्रह्मचि खेंळावे ।
ज्ञानाग्नीनें संचित सर्वहि जाळावें ॥
क्रियामाणहि बाधेना ऐसे बाळावे ॥
नारायणदासा तव चरणीं पाळावें ॥५॥

# आरती ५ – ॥ सीतेच्या शोधासि ॥

सुखि निद्रा करी आतां स्वामि बलभीमा श्रीगुरु स्वामी बलमीना
जालीसे बहु निशि आतां ध्यावें विश्रामा ॥धृ॥ देवा ॥

सीतेच्या शोधासि केलें लंकेसी जाण ।
मारुनि जंबूमाळी केले रावणदंडण ॥ देवा ॥
लीलामात्रें पुच्छालागीं अग्नि लावून ।
अर्धक्षणामाझारि केलें लंकेचें दहन ॥१॥

समुद्राच्या वरुते वेगि बांधुनि सेतूला ।
दशकंधरपुरिवरुते जाउनि चढविला हल्ला ॥ देवा ॥
लक्ष्मणाच्या साठीं उचलुनि द्रोणाचळ नेला ।
रामाचें निजसाह्य करुनिया विजयो मेळविला ॥२॥

Downloaded From HanumanChalisaPath.CoM

जाउनिया पाताळीं लोटुनि दिधलें देवीला ।
महिरावण घेउनिया पायाखालीं रगडीला ॥ देवा ॥
निरंजन विलासि रघुविर संतुष्ट केला ।
कीर्ती जयजयकार तुमचा त्रैलोकीं जाला ॥ देवा ॥३॥

# आरती ६ – ॥ जयदेवजयदेव जयजय ॥

जयदेवजयदेव जयजय हनुमंता ।
आरति ओवाळू तुज वायु सुता ॥धृ॥

अंजनीच्या उदरीं प्रगटुनिया जाण ।
उन्मतांचि क्षणीं केलें उड्डाण ।
स्पर्शुनिया रविमंडळ जालें से येण ।
अगाध तवगुणमहिमा न कळे विंदान ॥१॥

दशरथतनुजाची तनु होतां विखंडा ।
द्रोणाचळ उचलुनिया नेता प्रचंडा ।
मार्गीं सहजीं त्याचा पडलासे गुंडा ।
तो हा पृथ्वीवरुते शोभे जरांडा ॥२॥

Downloaded From HanumanChalisaPath.CoM

रघुवीराचे चरणीं ठेवुनीया प्रीती ।
त्रैलोक्याचे ठायीं वाढवीली ख्याती ॥
सद्भावें नीरंजन करितो आरती ।
पूर्णकटाक्षें ईक्षण करि त्याच्या वरुती ॥३॥

# आरती ७ – ॥ जय जय बलभीमा ॥

जय जय बलभीमा बलभीमा ।
अगाध तवगुण – महिमा ॥धृ॥

वंदुनिया श्रीरामा केली ।
निजबळ तूं बळसीमा ॥१॥

सीताशोक निवारून ।
केले लंकापुरिच्या दहना ॥२॥

द्रोणाचळ गिरि अणिला ।
बंधु लक्ष्मण वांचंविला ॥३॥

Downloaded From HanumanChalisaPath.CoM

निरंजन तवपायीं ।
भावें ठेवित येउनि डोई ॥४॥

# आरती ८ – ॥ जयदेव जयदेव जय अंजनितनया ॥

जयदेव जयदेव जय अंजनितनया ॥
आरति बोवाळूं तुज करुणानि लया ॥ध्रु०॥

HanumanChalisaPath.CoM

अभिवन प्रतापमहिमा न बोलवे वाणी ॥
फळ म्हणवुनियां धरिला बाळपणीं तरणी ॥
अहिरावण महिरावण मारुनिया दोनी ॥
आणिला रघुविर केली अघटित हे करणी ॥१॥

शत योजन एका उडुअणें उदधी ॥
लंघुनि क्रौंचा वधिलें अगणीत बळबुद्धी ॥
लंकाप्रवेश करुनी दशमुख अतिक्रोधी ॥
राक्षस गांजुनि केली त्वां सीताशुद्धी ॥२॥

अशोकवन विध्वंसुनि वनचर निर्दळिले ॥
लंका जाळुनि पुच्छें रजनीचर छळिले ॥
श्रीरामासह सैन्य कपिगण तोषविले ॥
म्हणती भीम पराक्रम हनुमंतें केले ॥३॥

रामानुजसह सेने शक्ती लागतां ॥
द्रोणागिरि आणिला तो रवि-उदय नव्हतां ॥
अमृतसंजीवनी देउनियां त्वरितां ॥
संतोषविले दशरथसुतमहिजा-कांता ॥४॥

Downloaded From HanumanChalisaPath.CoM

महारुद्रा हनुमंता देवा बलभीमा ॥
प्रियकर दास्यत्वें तूं होसी श्रीरामा ॥
शिव शंकर अवतारी निस्सीम सीमा ॥
नि:संगा निजरंगा मुनिमनविश्रामा ॥५॥

# आरती ९ – ॥ कोटीच्या ही कोटी गगनीं उडाला ॥

कोटीच्या ही कोटी गगनीं उडाला ।
अचपळ चंचल द्रोणाचळ घेउनि आला ॥
आला गेला आला कामा बहुतांला ।
वानर कटका चुटका लावुनियां गेलां ॥ १ ॥

जय देव जय देव जयजी बलभीमा ।
आरती ओवाळूं सुंदर गुणसीमा ॥ धृ. ॥

Downloaded From HanumanChalisaPath.CoM

उत्कटबळ तें तुंबळ खळबळली सेना ।
चळवळ करितां त्यासी तुळणा दीसेना ॥
उदंड किर्ती तेथें मन हें बैसेना ।
दास म्हणे न कळे मोठा कीं साना ॥ २ ॥

# आरती १० – ॥ जय जय अंजनिबाला ॥

जय जय अंजनिबाला ।
पंचारति ही करितों तुजला ॥ धृ. ॥

सीताशुद्धिस्तव जावोनी ॥
जाळीली लंका ।
दुष्ट वधोनी ॥
जानकिसह रामाला ।
नेसी अयोद्धे सुखधामाला ॥ जय. ॥ १ ॥

Downloaded From HanumanChalisaPath.CoM

चरणी शरण मी भावें आलो ।
ब्रह्म सदोदित ह्रदयी खेळो ॥
ऐशा दे ज्ञानाला ।
धन्य करी या बलवत्कविला ॥ जय. ॥ २ ॥

# आरती ११ – ॥ जयजय श्रीबलभीमा ॥

जयजय श्रीबलभीमा , मारुति अंजनिच्या नंदना हो ।
राक्षसकुळ हानना, अनाथनाथा करुणाघना हो ॥धृ॥

HanumanChalisaPath.CoM

सीता विरहें दुःखित, सीता सीता आक्रंदत हो ।
पंपातीर्थ तटाकिं, रघुविर पाहिला अवचित हो ।
तो प्रभु सद्‌गुरु केला, भावें होऊनि शरणांगत हो ।
निश्चय पण आदरिला, सीता शुद्धीचा संकेत हो ।
दक्षिणपंथें उडाला, टाकुनि मागें प्रभंजना हो ॥जय॥१॥

शोध सितेचा केला, क्रोधें जाळुनि लंकापुर हो ।
रामेश्वर लिंगापुढें, जाणों लाविला कापूर हो ।
राक्षस वधितां वहाती, तद्रक्ताचे तुंबळ पुर हो ।
नादें अंबर गर्जे, बहु भय वाटे दिग्गज मना हो ॥जय॥२॥

क्षणमात्रें शतकोटी, पर्वत उपडी बाहूबळें हो ।
फाटे धरणी तटाटे, हालवी ब्रह्मांड लांगुलें हो ।
राक्षस म्हणती भक्षक शिक्षक झाली गोलांगुलें हो ।
आत्मा कुलक्षय पाहुनि, रावण मोडित शत अंगुलें हो ।
प्राणमित्र म्हणे टाकुनि, अहिमहि गेले यमसदना हो ॥जय॥३॥

Downloaded From HanumanChalisaPath.CoM

पडतां रणिं लक्ष्मूमण, वेगें द्रोणागिरी आणिला हो ।
चार वेळ रात्रींतून, गेला आला गेला अला हो ।
सीता हरतां मरतां, भरतां सरतां जय पावला हो ।
राम सिता सौमित्रा मारुति सप्राण भावला हो ।
भवबाधेची तोडी, विष्णूदासाची कल्पना हो ॥जय॥४॥

# आरती १२ – ॥ जयजय महावीर धीर चरिंजवि ॥

जयजय महावीर धीर चरिंजवि, मारुती बलभीमा ।
जनकसुता-भय-शोक-नविारण,कपगिण-वशि्रामा ।
दशकंधर पुर दाहक प्रयिकर, दाशरथी रामा ॥जयजय॥धृ॥

HanumanChalisaPath.CoM

जन्मतांचि पुढें नवल देखलिें, रक्तवर्ण नयनीं ।
बाळ क्षुधति तें फळ म्हणुनि बळें, झेंपावें गगनीं ।
ग्रहणकाळ खग्रास केतुवत, रवि घालि वदनीं ।
समर करुनि अरि अमर भासलि, करतिां संग्रामा ॥जय १॥

कडाडलिें ब्रह्मांड झोकतिां, क्रोधें उड्डाण ।
क्षणमात्रें तळ मुळ उत्पाटुन, आणलिा गरि द्रोण ।
लक्ष्मणासह मृत रणकपचिा, जीववलिा प्राण ।
खळ राक्षसकुळ सकळ धाडलिें, रवनिंदन-धामा ॥जय २॥

वज्रतनू घनशाम वरिाजे, तेज प्रखर तरणी ।
अटवि जेठ निटि कटि कासूटी, कुंडलेंदु करणी ।
मुगुट गळा हार भार डोलती, नुपुर द्वय चरणीं ।
सजल नयन पुट जलज वदन शशी, सज्जन सप्रेमा ॥जय ३॥

Downloaded From HanumanChalisaPath.CoM

दुर्घट संकटें कोटि लोपतीं, देतां बुभुःक्कार ।
करुणासागर नत जनीं वागवि, ब्रीद अहंकार ।
वष्णिुदास कर जोडुनि नमना, करी वारंवार ।
चरण गुणार्णव अगणति वर्णन, न कळे तव सीमा ॥जय ४॥